# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

## शासकीय तंत्रनिकेतनच्या बाजुला, उस्मानपुरा

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org roaurangabad.dte@gmail.com


**तात्काळ/महत्वाचे**

जा.क्र.विकाऔ/आस्था-३/२०१७/ ५४४

दिनांक :- 14 FEB 2017

प्रति

प्राचार्य,

शासकीय अभियांत्रिकीय/ औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, औरंगाबाद

उपसचिव तंत्रशिक्षण मंडळ, प्रा. का. औरंगाबाद

प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, औरंगाबाद,जालना,अंबड/हिंगोली/जिंतूर, नांदेड,बीड, उस्मानाबाद, पु.ला.शा.त.लातूर,निवासी महिला लातूर

**विषय** :- दि. २३-९-२०११ नंतर शासकीय सेवेत रुजू झालेल्या गट- क संवर्गातील कर्मचा-यांना पायाभूत प्रशिक्षण देणेबाबत.

**संदर्भ**:- १) सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र.टिआरएन-०९/प्र.क्र.३९/०९/१२-अ,दि.२३-९-२०११

२) या कार्यालयाचे पत्र क्र. विकाऔ/आस्था३/२०१६/६६६७, दि. २७/१०/२०१६

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये दि.२३-९-२०११ नंतर शासकीय सेवेत नव्याने नियुक्त झालेल्या गट-क संवर्गातील शासकीय कर्मचा-यांना १२ दिवसाचे पायाभूत प्रशिक्षण व दि. २३-९-२०११ पुर्वी शासन सेवेत नियुक्त झालेल्या कर्मचा-यांना ५ दिवसाचे उजळणी प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. त्यानुसार मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी नाथनगर, पैठण येथे या कार्यालयाकडून वेळोवेळी पायाभूत/उजळणी प्रशिक्षणासाठी गट-क संवर्गातील कर्मचा-यांना प्रतिनियुक्त करण्यात आलेले आहे. तथापि संस्थेतील कामाचे स्वरुप व कर्मचा-यांच्या वैयक्तिक अडचणीमुळे काही कर्मचारी यांना प्रशिक्षणास हजर राहण्यासाठी संस्था/कार्यालयाकडून कार्यमुक्त करण्यात आलेले नाही. त्यामुळे संबधित कर्मचारी प्रशिक्षणापासून वंचित राहिले आहेत.

यापुर्वी वरील संदर्भ क्र. २ अन्वये माहिती मागविण्यात आली होती. अदयापही काही कर्मचा-यांनी पायाभूत प्रशिक्षण घेतले नसल्याचे दिसून येते. त्यानुसार **गट-क व ड संवर्गातील** दि.२३-९-२०११ नंतर शासकीय सेवेत नव्याने नियुक्त झालेल्या व या कार्यालयाकडून मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी नाथनगर, पैठण येथे प्रशिक्षणासाठी प्रतिनियुक्त करण्याबाबतचे आदेश निर्गमीत झालेल्या परंतु प्रशिक्षणासाठी कार्यमुक्त न करण्यात आलेल्या/ पायाभूत प्रशिक्षण न घेतलेल्या कर्मचा-यांची नावे दि.१६-०२-२०१७ पर्यंत या कार्यालयास पाठविण्यात यावीत. जेणेकरुन संबधितांना प्रशिणासाठी प्रतिनियुक्त करण्याबाबत आदेश निर्गमीत करणे शक्य होईल. संस्थेतील कर्मचारी प्रशिक्षणापासून वंचित राहिल्यामुळे भविष्यात होणा-या सांभाव्य परिणामास संबधित कर्मचारी/ संस्थाप्रमुख जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी .

(महेश शिवणकर)

प्र.सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद

प्रत:- या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना माहिती व संकेतस्थळावर अपलोड करण्यासाठी.

C/Astha -3/Cerculacer